# श्री वसंतराव नाईक

## यांचे कार्य व विचार



संपादक – प्रा. डॉ. एस. ए. राठोड

सह संपादक – प्रा. डॉ. व्ही एम जाधव

प्रा. महेंद्र गिरी

EAGLE LEAP

Scanned with CamScanner

ईगल लीप प्रकाशा, पुणे

# श्री वसंतराव नाईक यांचे कार्य व विचार

संपादक : प्रा. डॉ. एस. ए. राठोड
सह संपादक : प्रा. डॉ. व्ही एम जाधव
प्रा. महेंद्र गिरी

© प्रकाशक आणि मुद्रक : :
संदेश दादाराव पहुळकर,
ईगल लीप प्रिंटर्स अॅड पब्लिकेशा प्रा. लि. पुणे
ऑफिस ंबर 28, विशाल रेसिंडंसी, कासारवाडी,
पुणे - 411 034
संपर्क : 8600071634

**ISBN : 978-81-955422-4-6**

**प्रथमावृत्ती :**
2 April 2022

**मुखपृष्ठ :**

**अक्षर मांडणी :**

**Shiv Paul**, Eagle Infomedia, Pune

या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पूननिर्मिती अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी - फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणूकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या व लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. यासाठी सर्व हक्क राखून ठेवले आहेत.

Scanned with CamScanner

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेखकाचे नाव | शीर्षक | पा.नं |
|---|---|---|---|
| १. | डॉ. नेमीचंद चव्हाण | महाराष्ट्राच्या भूमीला सुजलाम सुफलाम बनविणारा प्रर्जन्य दूत महानायक वसंतराव नाईक. | १ |
| २. | प्रा.उद्धव दशरथ चव्हाण | महाराष्ट्राचे पाईक: ना. वसंतराव नाईक | ७ |
| ३. | प्रा. सुनील.जी. ढाकुलकर | श्री वसंतराव नाईक यांचे राजकीय विचार | १२ |
| ४. | डॉ.विजयेंद्र पाटील<br>प्रा.डॉ.दीपक शिरसाट | वसंतराव नाईक कार्य आणि कर्तृत्व | १५ |
| ५. | प्रा.दत्ता बी.जाधव | महाराष्ट्राच्या विकासात वसंतराव नाईकांचे योगदान | २० |
| ६. | Dr.Indal G.Jadhao | Vasantrao Naik:A True Son of Soil | २७ |
| ७. | प्रा. महेंद्र खुशालगिर गिरी | महाराष्ट्राच्या राजकारणावर विदर्भाचा प्रभाव ( स्वातंत्रोत्तर काळ) | ३२ |
| ८. | डॉ. एन.बी. मठपती | महाराष्ट्राच्या कृषी व औद्योगिक | ३९ |
| ९. | डॉ.उल्हास.एन.राठोड | मा.वसंतराव नाईक हरितक्रांतीचे प्रणेते | ४३ |
| १०. | डॉ.एन.ए.पिस्तूलकर | मुख्यमंत्री, वसंतराव नाईक यांचे दुष्काळाचे यशस्वी अर्थकारण! | ५२ |
| ११. | प्रा. एम.जी. राठोड | अष्टपैलू व्यक्तिमत्व: वसंतराव नाईक | ५६ |
| १२. | Mr.C.N.Sonar | Remembering the legacy of Vasantrao Naik | ६० |
| १३. | Prof. Prakash D.Shrungare | PANCHAYAT RAJ: VASANTRAO DECENTRALIZES INDIAN DEMOCRACY | ६६ |
| १४. | डॉ. शरद जानराव वाघोळे | विकासाचा महामेरू : वसंतराव नाईक | ७२ |
| १५. | डॉ. अनिल काळबांडे | हरित क्रांतीचे प्रणेते मा वसंतराव नाईकांचे मौलिक विचारधन | ७६ |
| १६. | श्रीमती ज्योती काळबांडे | वसंतराव नाईक यांचे राजकीय कार्य | ८० |
| १७. | Dr.Ashwinkumar.R Rathod | Vasantrao Naik and Progressive Politics | ८७ |


Scanned with CamScanner

# 7 महाराष्ट्राच्या राजकारणावर विदर्भाचा प्रभाव (स्वातंत्र्योत्तर काळ)

प्रा. महेंद्र खुशालगीर गिरी
श्रीमती राधाबाई सारडा कला–वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती (महा.)
मो.नं. 9421736662 Email : mkgiri7867@gmail.com

महाराष्ट्र ही संताची, विचारवंताची, वीरांची भूमी. या महाराष्ट्र भूमीत अनेक संत, महात्मे आणि वीरांनी जन्म घेतला. वीरत्व, वैराग्य, विज्ञान, धर्म, अर्थ, शिक्षण यांच्या परंपरा या महाराष्ट्र भूमीत एकत्र नांदल्या. महाराष्ट्र ही कणखर थंड लाव्हांच्या थरांनी बनलेली भूमी, या कणखर काटेरी देशात रंगेलपणा सोबतच रंगेलपणाही जोपासला गेला. इतर प्रदेशापेक्षा महाराष्ट्राची परंपराच वेगळी सर्व प्रेरक विचारांचे व भावनांचे प्रवाह या महाराष्ट्र भूमीत एकत्र आणि एकोप्याने नांदतात. महाराष्ट्रीय लोकजीवन आपल्या बहूविध सौदर्यासह आणि वैशिष्ट्यांसह विकसित झालेले आहे. महाराष्ट्राची ही ज्ञानगंगा विविध विचारांचे वैचारीक प्रवाह घेवून काठोकाठ वाहिली. सह्यांद्री सारखा कणा या भूमीला लाभला. ह्या पठारांचा भाग म्हणजे भारताचा सर्वात प्राचिन आणि प्रबळ प्रदेश. उंच शिखर कळसुबाई, उत्तरेला त्याच्याशी काटकोन करणारा सातपुडा, उत्तर सीमेला सातपुडा तर पश्चिमेला सह्यांद्री या दोन्ही अभेद्य डोंगरानी दक्षिण पठारांचा सांभाळ केला आहे. वऱ्हाड खान्देशाची काळी कसदार जमीन, नगर सोलापूर कडील कोरडी जमीन आणि सातारा कोल्हापूरची मळीची जमीन अशी विविधता असणारा पठाराचा प्रदेश, मावळ, कोकण, वऱ्हाड, मराठवाडा, खान्देश असे विविध प्रभाग घेवून महाराष्ट्र उभा आहे.

**प्राचिन विदर्भ:**

विदर्भाचा इतिहास हा प्राचिन असून तो ऋगवेदातील माहितीत सापडतो. ऋषभदेव राजाच्या नऊ पुत्राचे नाव विदर्भ असे होते. ऋषभदेवाने साम्राज्यातील १३ खंडापैकी एक भाग विदर्भाला दिला. तो भाग विदर्भ खंड म्हणून ओळखला जातो. भागवत पुराणातही उल्लेख आढळतो. यदुवंशाच्या भोज शाखेत ऋषभदेव हा प्रमुख होता. त्याचाच पुत्र विदर्भ होय. महाभारतातही वनपर्वत विदर्भाविषयी उल्लेख आढळतात. अगस्तऋषी पूर्वेकडून विदर्भात प्रवेश करणारा पहिला यती ऋषी. याच अगस्ती ऋषीची पत्नी लोपामुद्रा विदर्भ राजकन्या होती, नल राजाची पत्नी दमयंती ही सुध्दा राजकन्या. प्राचिन विदर्भाची राजधानी वरदा तटाशी उभी असलेली तत्कालीन नगरी कौंडिण्यपूर, कुंडीणपूर ही होय (सद्याचे कौडण्यपूर) विदर्भाला वऱ्हाड या नावाने ओळखले जाते. या संदर्भातील लोकमाणसात एक म्हणही प्रसिध्द आहे.



Scanned with CamScanner

'वऱ्हाड सोन्याची कुऱ्हाड' या म्हणी प्रमाणे वऱ्हाड हा शांत सुपीक आणि श्रीमंत होता हे निर्देशित होते. यादवांचा सेनापती खोलेश्वर यांच्या वेळेस वऱ्हाडास वरदातट असे म्हणत. मात्र या वऱ्हाडात केवळ अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ या जिल्ह्याचाच समावेश होता. विदर्भात मात्र सद्याचे सर्वच जिल्हे आहेत. एकूणच पूर्वीचा विदर्भ प्रदेश सद्याच्या विदर्भ प्रदेशापेक्षा विस्तृत होता. वाकाटक सम्राट हरिषेणाचे विदर्भातील साम्राज्य हे सातमाळ पर्वतराजीच्या दक्षिणेकडील गोदावरीच्या खोऱ्यापर्यंत होते. यात आजच्या अकोला, यवतमाळ, परभणी, नांदेड, अदिलाबाद जिल्ह्याचा भाग तसेच छत्तीसगडचा बरा भाग तत्कालीन विदर्भात मोडत होता. हा प्रदेश साधारणत: गोदावरी ते नर्मदा असा दक्षिणेत्तर व रायपूर जिल्हा ते धुळे जिल्हा खान्देश असा पूर्व—पश्चिम प्रदेश विदर्भात होता.

विदर्भातील राजकारण व समाजकारण:—

महाराष्ट्र राज्याच्या राजकारणात विदर्भाचा प्रभाव नेहमीच प्रभावी व वरचढ राहिला आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात सामाजिक व राजकीय प्रभाव विचार या दृष्टीने विदर्भ प्रभावी आहे. भारताच्या मध्यभागी असल्याने हृदयस्थान म्हणून विदर्भाची ओळख आहे. कापूस उत्पादनाच्या क्षेत्रात आशिया खंडात विदर्भाचे नाव आहे.

राजकीयदृष्ट्या विचार करता महाराष्ट्राच्या विकासाला गतीमान आणि प्रभावी करणारे दादासाहेब कन्नमवार, वसंतराव नाईक, सुधाकरराव नाईक, देवेंद्र फडणवीस यांचे सारखे विकासाला प्राधान्य देणारे कर्तृत्ववान मुख्यमंत्री, प्रतिभाताई पाटील ह्या भारताच्या महिल्या महिला राष्ट्रपती, तर लोकनायक बापुजी अणे, प्रा. राम कापसे, प्रभा राव, रजनी रॉय, सुधाकरराव नाईक, रा. सू. गवई, बनवारीलाल पुरोहित यांच्या सारखे दिग्गज राजकारणी राज्यपाल म्हणून विविध राज्यात गेले व आपल्या प्रभावी भूमिकेतून त्या राज्याला विकासाचा हातभार लावला. हि सर्व मंडळी महाराष्ट्राला नव्हे तर देशाला योगदान देणारी होती. सर्वच दृष्टीने कसदार असलेल्या विदर्भाच्या या भूमीने या भूमीपुत्राच्या माध्यमातून राजकारण, समाजकारण या दोन्ही पातळीवर महत्वपुर्ण कामगिरी केली आहे. या विदर्भात स्वातंत्र्योत्तर काळापासून अनेक राजकीय सामाजिक स्थित्यांतरे झाली. त्याच बरोबर आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, औद्योगिक, सहकार, शेती, सिंचन इत्यादी अनेक क्षेत्रात स्थित्यांतरे झाली.

२०२० हे महाराष्ट्र राज्याचे हिरक महोत्सवी वर्ष ०१ मे १९५६ रोजी द्विभाषिक मुंबई राज्याची स्थापना झाली. त्यानंतर झालेल्या १९५७ च्या निवडणूकीत संयुक्त महाराष्ट्र समितीने मुंबई महाराष्ट्रासह मराठवाडा आणि महागूजरात समितीने गुजरातमध्ये कॉंग्रेस पक्षाचा पराभव केला. विदर्भात ६२ पैकी ५४ आमदार कॉंग्रेसचे निवडून आले होते. विदर्भ हा कॉंग्रेसचा पूर्वी पासूनच बालेकिल्ला राहिलेला होता. त्यावेळी स्वतंत्र विदर्भाच्या मागणीसाठी विदर्भातील सर्व आमदारांनी आपले राजीनामे त्यांचे विदर्भातील नेते मारोतराव कन्नमवार यांच्याकडे सुपुर्द केले होते. त्यानंतरच्या



Scanned with CamScanner

घडामोडी मध्ये पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या आग्रहामुळे विदर्भवादी कॉंग्रेसचे नेते संयुक्त महाराष्ट्रात सामील होण्यास तयार झाले. त्यामुळेच संयुक्त महाराष्ट्र आजच्या सारखा साकार होऊ शकला, याचे सर्व श्रेय त्यावेळेचे नेते मारोतराव कन्नमवार यांना जाते. त्यांच्या बद्दल महाराष्ट्राने कृतज्ञता ठेवली पाहिजे. त्यांनी वैदर्भियांचा राग ओढावून घेतला पण ते प्रथम राज्याचे उपमुख्यमंत्री झाले आणि हिमालयाच्या मदतीला 'सह्याद्री' म्हणजे यशवंतराव चव्हाण धावून गेल्यानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले.

स्व. मारोतराव कन्नमवारचे नेतृत्व संयमशील आणि प्रभावी होते. त्यांनी स्वातंत्र्य लढयात सहभाग घेतला होता. नंतरच्या काळात मुख्यमंत्री झाल्यावर महाराष्ट्र राज्याच्या विकासाच्या दृष्टीने त्यांनी केवळ विदर्भ या एकाचा प्रातांचा विचार न करता तर महाराष्ट्राच्या हिताच्या व विकासाच्या दृष्टीने शेती व सिंचन व उद्योग जगताच्या प्रश्नात लक्ष घातले. विदर्भाच्या प्रभावी नेतृत्वाच्या संदर्भात मारोतराव कन्नमवाराच्या आधीच्याही नेतृत्याचा विचार करावा लागतो. त्यामध्ये प्रामुख्याने स्वतंत्र विदर्भ आंदोलनातील टिळक—गांधी युगातील प्रतिनिधी लोकनायक बापूजी अणे, टिळकांच्या स्वातंत्र्यलढयातील प्रभाव त्यांनी अनुभवला होता. जंगल सत्याग्रह केला. व्हाईसरायच्या कार्यकारी मंडळात ते सामील झाले. बिहाराचे राज्यपाल म्हणून राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांनी त्यांची नेमणूक केली. पुढे श्रीलंकेचे उच्चायुक्त म्हणून काम केले. लोकनायक बापूजी अणे बद्दल डॉ. राजेंद्र प्रसाद यांना नितांत आदर होता. डॉ. राजेंद्र प्रसाद त्यांना वाकून नमस्कार करीत. याच विदर्भाच्या आंदोलनातील एक प्रभावी व्यक्तिमत्व म्हणजे बॅ. रामराव देशमुख, त्यांच्या नेतृत्वाखाली १८ ऑगस्ट १९४० रोजी वर्धा येथे महाविदर्भ सभेची स्थापना झाली. बॅ. रामराव देशमुख विदर्भातील उच्च विद्याविभुषीत चारित्र्यसंपन्न आणि विश्वासार्ह नेतृत्व होते. लोकनायक बापुजी अणे यांचे ते विश्वासु सहकारी होते. लोकनायकांनी स्वतंत्र विदर्भ आंदोलनातील तिव्रता अधिक प्रभावी केली होती. नागपूरच्या पोटनिवडणूकीच्या वेळी संयुक्त महाराष्ट्र समितीचे उमेदवार बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांचा पराभव करुन बापूजी अणे नागपूर लोकसभा पोटनिवडणूकीत निवडून आहे. १९६२ च्या लोकसभा निवडणूकीतही स्वतंत्र विदर्भ आंदोलनाचा दबदबा कायम राहिला. विदर्भ आंदोलन समितीचे उमेदार म्हणून बापूजी अणे होते. त्यांनी रिखबचंद शर्मा यांचा पराभव करुन ते निवडून आले. या निवडणूक प्रचारासाठी कॉंग्रेसचे दिग्गज नेते आले. त्यात पंडीत नेहरु स्वत: आले. नेहरुजींनी बापूजी अणे यांचा आदरपुर्वक उल्लेख आपल्या भाषणात केला तो असा की, 'बापुजी खास आदमी है' या प्रचार सभेत त्यांनी कॉंग्रेस उमेदवार रिखबचंद शर्मा यांचा कोणताही उल्लेख केला गेला नाही. त्यानंतर बापुजी अणे यांचे सहकारी अनुयायी 'मराठी जग' हे विदर्भाचे दु:ख मांडण्यासाठी साप्ताहिक चालविणारे त्र्य. गो. देशमुख (टि. जी. देशमुख) कॉंग्रेसमधून ते राज्यसभेवर गेले. टि. जी. देशमुख यांनी 'विदर्भ आंदोलन' हे दैनिक वृत्तपत्र चालविले. नागविदर्भ आंदोलन समिती तर्फे नागपूर महानगर पालीकेच्या निवडणूका लढवल्या ते महापौरही झाले. १९८० च्या विधानसभा निवडणूकीत ते कॉंग्रेसचे आमदार झाले. काही काळ



Scanned with CamScanner

राज्यमंत्रीपद भूषविले टि. जी. नी मराठवाडा आणि विदर्भाच्या मागास भागाच्या विकासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले, कष्ट घेतले.

महाराष्ट्राच्या राजकारणात आणि समाजकारणावर व प्रशासनावर विदर्भातील अनेक दिग्गज नेत्यांनी ठसा उमटविला व आपली कर्तबगारी सिध्द केली. त्यात अनेक नामवंत राजकारणी आहेत. तेही विदर्भातील त्यापैकीच ज्यांच्या विस्ताराने उल्लेख करावा लागतो. ते सर्वात प्रदिर्घ काळ महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री राहिलेले स्व. वसंतराव नाईक यांचा. भारतामध्ये जसे राजस्थान म्हटले की मुखाडीया, पंजाबचे नाव उच्चारताच बादल, तसेच महाराष्ट्राचा उल्लेख आला की, वसंतराव नाईकांचे नाव सर्वांच्या तोंडी येतेच. महाराष्ट्राचा उल्लेख नाईकाशिवाय पूर्ण होत नाही.

यवतमाळ जिल्हयातील पुसद सारख्या लहान तालुक्यातून त्यांनी आपल्या राजकारणाला सुरुवात केली. बंजारा बहूल असलेल्या या भागात त्यांनी बंजारा समाजाचे नेतृत्व केले. मराठवाड्याच्या सीमेला लागून असलेला हा भाग. वसंतराव नाईक हे पुसद तालुक्यातील गहूली या गावाचे त्यांचे वडील तेथील बंजारा तांड्याचे नायक बाबासाहेब यांचे चिरंजीव पुसद नगर परिषदेची निवडणूक लढवून १९४६ ते १९५२ दरम्यान पुसद नगरपरिषदेचे ते अध्यक्ष होते. १९५२ साली मध्यप्रदेश सरकार मध्ये उपमंत्री झाले. १९५६ ते १९६० या काळात द्विभाषिक मुंबई राज्याचे कृषीमंत्री झाले. १ मे १९६० महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर महाराष्ट्र सरकारमध्ये सर्वप्रथम महसूलमंत्री झाले. राज्यातील सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा विचार सर्वप्रथम महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी मांडला होता. याकरीता त्यांनी विकेंद्रीकरण समिती नेमली तिचे अध्यक्ष वसंतराव नाईक हे होते. त्यांच्याच अहवालातून पंचायत राज यंत्रणा महाराष्ट्रात अस्तित्वात आली. लोकशाहीचे विकेंद्रीकरण त्रिसुत्री योजना म्हणजे ग्रामपातळीवरील ग्रामपंचायत, तालुकास्तरावर पंचायत समिती आणि जिल्हास्तरावर जिल्हापरिषद १२ जाने. १९५८ रोजी बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशींना मान्यता देण्यात आली. त्यानुसार लोकशाही विकेंद्रीकरणाच्या प्रक्रियेत अनेक राज्यांनी नवे कायदे करुन अंमलबजावणीस सुरुवात केले. त्यात महाराष्ट्रानेही याचा स्विकार केला. भारतातील काही राज्यांनी या समितीच्या शिफारशी जशाच्या तशा न स्विकारता त्यात काही शिफारशींमध्ये फेरफार केले. महाराष्ट्र राज्याच्या बाबतीत इ.स. १९६० साली श्री. वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त झाली. नाईक समितीने १९६१ साली अहवाल सादर केल्यावर महाराष्ट्रात त्याच वर्षी महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती कायदा १९६१ असा तयार करण्यात आला. आपल्या महाराष्ट्रात जिल्हा परिषद व पंचायत समिती यंत्रणा अस्तित्वात आणण्याचे कार्य त्यांनी केले. जिल्हा परिषद व पंचायत समितीचे अध्यक्ष हे जिल्हाधिकारी असावे व विकास खात्यातील जिल्हा पातळीवर काम करणारे अधिकारी सभासद असावे असे बलवंतराव मेहता समितीने सुचविले होते. गुजरात मध्येही असे सुचविण्यात आले परंतु वसंतराव नाईकांनी लोक प्रतिनिधीच अध्यक्ष झाला पाहिजे अशी दुरदर्शी सुचना



Scanned with CamScanner

केली. त्यामुळे खऱ्या अर्थाने सामान्याच्या हातात सत्तेची सुत्रे जाण्याची प्रक्रिया सुरु झाली हे विदर्भातील नेतृत्वाचे खरे यश होते.

वसंतराव नाईक हे ५ डिसेंबर १९६३ रोजी मुख्यमंत्री झाले. त्या काळात झालेल्या निर्णयात महत्वाचा निर्णय होता. मीसा खाली अटकेत असलेल्या आचार्य अत्रे यांना बिनशर्त मुक्तता करण्याचा संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील ते अग्रभागी असलेले नेते होते. या चळवळीतील झुंजार नेत्यास सोडविण्याचा निर्णय छेडत त्यांनी तत्कालीन वातावरणातील कटूता संपविली. त्यानंतर त्यांनी दारुबंदीचे धोरण सैल करण्याचा धाडसी निर्णय घेतला. १९६३ साली शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा त्यांनी निर्णय घेतला. शेतकऱ्यांची दुर्दशा पाहून वसंतराव नाईकांनी सरकारतर्फे ज्वारी खरेदी करुन ती ज्वारी रेशन दुकानातून वितरीत केली. ज्वारीचा हमीभाव ३४ रु. क्विंटल वरुन ६५ रुपयांवर नेऊन शेतकऱ्यांना दिलासा दिला. एकाधिकार खरेदीचे तत्व प्रचलीत होते ते त्यानंतर वसंतराव नाईकांनी त्याची सुरुवातच करुन दिली.

वसंतरावांनी मराठी भाषा ही महाराष्ट्राची राजभाषा ठरविण्यासाठी विधेयक १९६४ साली विधानमंडळाकडून संमत करुन घेतले व राज्यातील शासनाचे कामकाज मराठीतून चालविण्याचे आदेश दिले. एकप्रकारे मराठी मातृभाषेविषयी त्यांचा आदर या ठिकाणी दिसतो.

अन्नधान्यात महाराष्ट्र राज्य स्वयंपूर्ण करण्याचा ध्यास त्यांनी घेतला. यांत्रिक पध्दतीने त्यांनी शेती क्षेत्रात सुधारणा केल्या. अधिकाधिक पडीक जमीन लागवडीखाली आणणे, खार जमीनी सुधारणा, ओलीताखाली क्षेत्र वाढविणे यासाठी शेतकऱ्यांना सवलती हे उपाय योजनेत आणले. १९६६ अखेर ६ हजार गावांना वीजपूरवठा केला गेला. वीजपंप बसवून पाणी पुरवठ्याची सोय, संकरीत कापूस, संकरीत ज्वारी घेणे, धान्य आघाडीवर स्वावलंबी बनने याचा ध्यास घेत त्यांनी दौरे केले. शेतकऱ्यांनी आधुनिकतेचा ध्यास धरावा यासाठी प्रयत्न केले. शेतकऱ्यांच्या शेतात, बांधावर जावून ते शेतकऱ्यांना मार्गदर्शन करीत. राज्यपातळीवर पहिले बियाणे महामंडळ त्यांच्याच कारकिर्दीत स्थापन झाले. त्यांचाच तो निर्णय होता. चांगले गुणवत्तापुर्ण बियाण्याची निर्मिती व संशोधन यासाठी महाबीज ने प्रयत्न केले. डाळी, तेलबिया, कापूस, संकरीत ज्वारी अशा अनेक बियाण्यांचे संशोधन करण्यात आले. शेती आणि अन्नधान्य यात संपन्नता व संशोधनात परिपुर्णता आण्याचे कार्य त्यांनी केले. सिंगापूर येथे त्यांचे निधन झाले.

त्यानंतरचा काळ महाराष्ट्राच्या राजकारणात काहीसा कटूता व आपला प्रभाव निर्माण झाला पाहिजे या इर्षेने राजकारण तयार केले गेले. विदर्भाच्या दृष्टीने हे महत्वपुर्ण होते. तरी फार काळ मुख्यमंत्री पदावर न राहिलेले वसंतराव नाईकाचे पुतणे सुधाकरराव नाईक पुढे मुख्यमंत्री बनले. आपल्या आवेशपूर्ण वेगात आपल्या कार्याची सुरुवात त्यांनी केली. परंतु मुंबई येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यामुळे त्यांनी नैतिक जबाबदारी स्विकारुन राजीनामा सादर केला. दहशतवादी हल्ल्यानंतर सुधाकर नाईक यांना सत्तेची सुत्रे हाती घेण्यासाठी महाराष्ट्रात पाठविले. सुधाकरराव नाईक हे शरद



Scanned with CamScanner

पवारांचे शिष्य होते. लोकोपयोगी अशा कार्यामुळे व राजकीय वर्चस्वामुळे पुढे हिमाचल प्रदेशाचे ते राज्यपाल झाले. त्यांनी मुख्यमंत्री असतांना महाराष्ट्रातील पाणी समस्येचे संदर्भात जलसंपदा मोहिम आखली व महाराष्ट्राच्या मंत्री मंडळात जलसंधारण हे खाते निर्माण केले. महसुलमंत्री ते मुख्यमंत्री असा त्यांचा राजकीय प्रवास. सावज टप्प्यात आल्याशिवाय मी शिकार करीत नाही अशी त्यांची राजकारणातील उक्ती कृती होती. वसंतराव नाईक नंतर विदर्भाच्या राजकारणात पुसद सारख्या छोट्याशा तालुक्यातुन सुधाकरराव नाईक यांनी आपली कारकिर्द आरंभ करुन राज्यपाल पदापर्यंतचा प्रवास वेगवेगळ्या कारणामुळे गाजला. उणेपूरे अडीच वर्ष ते मुख्यमंत्री राहिले. ( २५ जून १९९१ ते २२ फेब्रु. १९९३ पर्यंत) त्यानंतर ३०जुलै १९९४ ते १७ डिसें. १९९५ पर्यंत ते हिमाचल प्रदेशाचे राज्यपाल होते.

सुधाकरराव नाईकांची प्रतिमा एक रसिक राजकारणी व संस्कृती विषयीची आत्मियता असणारा अशी एकूणच त्यांची प्रतिमा. यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्यातील गहुली गावचे सरपंच ते पुसद पंचायत समितीचे सभापती, यवतमाळ जि. प. अध्यक्ष आणि त्यानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री अशी त्यांची कारकिर्द. थेट ग्रामीण भागातून आल्यामुळे सहाजिकच त्यांची नाळ हि मातीशी जुळलेली, भूमीपुत्राची वेदना त्यांनी अनुभवली होती. महाराष्ट्राची माती आणि या मातीतली नाती टिकविण्याचे काम सुधाकररावांनी केले. महाराष्ट्राची माती तहानलेली आहे. राज्याच्या शेतीचा प्रश्न बागाईती नसुन तो कोरडवाहू आहे हे लक्षात घेवून सुधाकरराव नाईकांनी जलसंवर्धन मोहिम आखली हा जलसंवर्धनाचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जलसंवर्धन नावानं स्वतंत्र खातं निर्माण करुन स्वतंत्र कॅबिनेट दर्जाचा मंत्री नियुक्त केला आणि हा धाडसी कार्यक्रम सुधाकररावांनी प्रभावीपणे राबविला. मोठ्या सिंचन प्रकल्पापेक्षा जलसंवर्धनाची छोटी आणि मध्यम कामे पूर्ण करुन जास्तीत जास्त शेतजमीन सिंचनाखाली होवू शकते. आणि अशा प्रकल्पामुळे शेतकरी निराधार, भूमीहीन प्रकल्पग्रस्त किंवा पुनर्वसनाचे प्रश्न निर्माण होत नाही हे ओळखण्याचे द्रष्टेपण सुधाकररावमध्ये होते. नंतरच्या काळात मुख्यमंत्रीपद गेल्यावरही आपल्या कार्यावरची निष्ठा त्यांनी कमी केली नाही. हिमाचल प्रदेशाचे राज्यपाल झाल्यानंतरही ते तिथे रमले नाही आणि परत महाराष्ट्रात येवून जलसंधारण समितीचे अध्यक्ष बनले व चिवटवृत्तीने जलसंधारणाच्या कामाचा पाठपुरावा केला. त्यांच्याच काळात जिल्हापरिषदेला बळकी आणण्याचे कार्य झाले. जिल्हापरिषदेच्या अध्यक्षाला आणि उपाध्यक्षाला राज्यमंत्री पदाचा दर्जा देवून प्रशासनातील अधिकाऱ्यांना त्यांचे निर्णय पाळणे बंधनकारक करणं एवढचं नव्हे तर राजशिष्टाचारा नुसार अधिकाऱ्यापेक्षा या पदाधिकाऱ्यांना वरचा दर्जा मिळवून देवून सुधाकररावांनी तो विचार सार्थही करुन दाखविला.

महाराष्ट्राच्या राजकारणात सुधाकररावांचे नाव ठसठशीतपणे नोंदले जाईल हे त्यांनी राजकारणाच्या गुन्हेगारा विरुध्द दिलेल्या लढ्याबद्दल महाराष्ट्राच्या राजकारणातला गुन्हेगारीला शरद पवार यांचा पाठींबा आहे असे जाहिररित्या बोललं जायचं पण त्या विरुध्द कृती मात्र कधीच होत नसे. पत्रकार, विचारवंत, सामाजिक



Scanned with CamScanner

कार्यकर्ते त्या विषयी खंत व्यक्त करण्यापलीकडे काहीच करु शकत नव्हते ही वस्तुस्थिती होती. सुधाकरराव नाईकांनी मात्र राजकारणातला गुन्हेगारवृत्तीच्या धनदांडग्यांना चांगलीच वेसन घातली.

महाराष्ट्राच्या राजकारण, समाजकारण आणि सांस्कृतिक विश्वात आपले वेगळे सांस्कृतिक अस्तित्व जपणारा प्रदेश म्हणून विदर्भाची ओळख आहे. सुरुवातीला आठ जिल्हे व नागपूर ऐकमेव आयुक्तालय असे सुरुवातीचे विदर्भाचे स्वरुप पुढे गोंदिया, वाशिम, गडचिरोली या तीन जिल्हयाची निर्मिती व अमरावती नवा विभाग व एकूण ११ जिल्हे असे महसुली विभागाचे स्वरुप असलेला विदर्भ मागच्या अडीच दशकात बदललेला दिसतो. अमरावती विभागातील आत्महत्याग्रस्त यवतमाळ, अमरावती जिल्हे. उत्तम प्रतीचा कापूस पिकवणारा हा प्रदेश व तेथील शेतकरी मोठया प्रमाणात अस्वस्थ व हवालदिल झाल्याचे चित्र दिसते. पूर्व विदर्भातील धान उत्पादक शेतकरी देखील विवंचनेत आहेत. नागपूर अमरावती जिल्ह्यातील संत्रा व फळे उत्पादक शेतकरी यांची अवस्था तीच आहे. त्याचबरोबर विदर्भात उद्योगधंद्याच्या संदर्भात विदर्भात नागपूर, अमरावती, चंद्रपूर, वर्धा सोडल्यास बाकी विदर्भाचे चित्रही आशादायक नाही. विदर्भातील काही उद्योगाला जागतिक बाजारपेठ मिळाली असली तरी रोजगार निर्मितीच्या संदर्भात निराशाच दिसते. नविन काही राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धा करणारे उद्योग येवू शकले नाही. पर्यटनास मात्र जंगलव्याप्त प्रदेशाची व्याघ्रप्रकल्पामुळे थोडी पुढे मजल मारली आहे. अप्पर वर्धा, गोसेखुर्द, इसापूर येथील उर्ध्व पैनगंगा, नळगंगा प्रकल्प रखडत का होईना परंतु मार्गी लागले. त्यामुळे शेतकऱ्यांना न्याय मिळाला. शिक्षण साक्षरतेच्या संदर्भात बऱ्यापैकी शैक्षणिक संस्था आल्यामुळे शैक्षणिक गुणवत्तेचे प्रमाण वाढले आहे.

विदर्भ विकासाच्या दृष्टीने आज विदर्भाचा चेहरा मोहरा बदलेला दिसतो. त्याही आधीचे राजकारणी मंडळी विदर्भ बिकासासाठी आग्रही होती. परंतु पश्चिम महाराष्ट्राचे प्रभुत्व विदर्भातील संयमी राजकारण्यांना पुढे जाऊ देत नव्हते. जरी चार मुख्यमंत्री, राज्यपाल व राष्ट्रपती पर्यंत मजल मारणाऱ्या विदर्भातील मागील राजकारण्यांना राष्ट्रीय स्तरावर आपले प्रभुत्व निर्माण करता आले नाही. परंतु सद्या मात्र हे प्रभावीपण जाणवायला लागले. पुढील काळात मात्र नक्कीच विदर्भ राष्ट्रीय स्तरावर आपल्या वेगळ्या अस्तित्वाची जाणीव घेवून आपले स्वयंसिध्द नेतृत्व नक्कीच निर्माण करेल यात संशय नाही.

Scanned with CamScanner